पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.

क प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक- ६

स भा वृ तां त

दिनांक २/१/२०१८ वेळ-दुपारी १२.०० वाजता

---------------------- ------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "क" प्रभाग समिती मासिक सभा मंगळवार दि.२/१/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.अश्विनी संतोष जाधव सभापती

२) मा.सारीका शिवाजी सस्ते

३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

४) मा.गीता सुशिल मंचरकर

५) मा.राहुल हनुमंतराव भोसले

६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

७) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.नितीन देशमुख- प्र.कार्यकारी अभियंता विदयुत,मा.प्रदीप मुथा- प्रशासन अधिकारी, मा.दवंडे- उपअभियंता पापु, मा. शिंदे, वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.शेख-कनिष्ठ अभियंता विदयुत,मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.वसंत उगले- लेखाधिकारी, हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

----

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- २) प्रभाग क्र.९ विठ्ठलनगर पुर्नवसन प्रकल्पाच्या जागेत वाचनालय/ अभ्यासिका इमारत बांधणेबाबत- मा.समीर मासुळकर,मा.वैशालीताई घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) प्रभाग क्र.६ मधील आरक्षण क्र.४३२ ला सीमाभिंत बांधण्याबाबत-मा.राजेंद्र लांडगे,मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) सीसीटीव्ही फुटेज (कॅमेरे) बसविण्याबाबत- मा.गीताताई मंचरकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

----

ठराव क्रमांक- १७ विषय क्रमांक-१

दिनांक २/१/२०१८ विभाग- विदयुत कक्षे कार्यालय

सुचक-मा.सारीका सस्ते अनुमोदक-मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ-मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचे जा.क्र.कक्षे/विदयुत/२/कावि/६५८/२०१७ दिनांक २/१/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे------

क विदयुत विभागाकडील शिकाऊ उमेदवारांना वाढीव वेतनाचा फरक अदा करणे आवश्यक असल्याने मनपाच्या क विदयुत विभागाकडील सन २०१७- २०१८ चे अंदाजपत्रकामध्ये **अस्थायी अस्थापना** या लेखाशिर्षावर क विदयुत विभागाकडील **बोनस तथा सानुग्रह अनुदान** या लेखाशिर्षावरुन र.रु.१,५०,०००/- तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक- १८ विषय क्रमांक- २

दिनांक २/१/२०१८ विभाग-

सुचक-मा.समीर मासुळकर अनुमोदक-मा.वैशाली घोडेकर

संदर्भ-मा.समीर मासुळकर,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.९ विठ्ठलनगर पुर्नवसन प्रकल्पाच्या मोकळया जागेत व पाण्याच्या टाकीची सिमाभिंतीलगत तेथील विद्यार्थी व नागरीक यांचेसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे वाचनालय / अभ्यासिका इमारत सध्या प्रभाग / मुख्यालयामधील निविदा प्राप्त कामातून सदरचे काम पूर्ण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १९ विषय क्रमांक- ३

दिनांक २/१/२०१८ विभाग-

सुचक-मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक-मा.सारीका सस्ते

संदर्भ-मा.राजेंद्र लांडगे,मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६ मधील धावडेवस्ती येथील आरक्षण क्र.४३२ याठिकाणी कोणी तेथे कोणी ताबा न घ्यावा म्हणुन त्या आरक्षणावर सिमाभिंत बांधण्यात यावी.जेणेकरुन तेथे कोणी अतिक्रमण करु शकणार नाही.

तरी त्याठिकाणी लवकरात लवकर सिमाभिंत बांधण्यात व विकसीत करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- २० विषय क्रमांक- ४
दिनांक २/१/२०१८ विभाग-
सुचक-मा.गीता मंचरकर अनुमोदक-मा.राहूल भोसले
संदर्भ-मा.गीता मंचरकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.९ मधील खराळवाडी व कामगारनगर या भागांमध्ये संरक्षणासाठी सीसीटीव्ही फुटेज (कॅमेरे) खालीलप्रमाणे बसवुन देणेत यावेत.

१) रोप्लास कंपनी समोर एंन्ट्रसला - दोन कॅमेरे
२) खराळवाडी मंदीर- दोन कॅमेरे
३) बालभवन – चार कॅमेरे
४) भागवत गीता मंदीर- दोन कॅमेरे
५) महेश मित्र मंडळ – दोन कॅमेरे
६) हनुमान चौक- दोन कॅमेरे
७) कर्मयोग सोसायटी- दोन कॅमेरे
८) युनायटेड चर्च- दोन कॅमेरे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर सर्वांचे आभार मानून मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/
**(अश्विनी संतोष जाधव )**
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – २६.
क्र-कक्षेका/कावि/४ /२०१८.
दिनांक- १५ /१/२०१८.

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-सर्व संबंधित विभाग
-------------------